महाराष्ट्र टाइम्स

# येऊर भूमाफियांविरोधात आदिवासींचा 'एल्गार'!

## जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा

**म. टा. वृत्तसेवा,** ठाणे

बिल्डर, भूमाफियांपासून येऊरचे जंगल, वन्यजीवन तसेच स्थानिक आदिवासींना संरक्षण मिळावे, या मागणीसाठी आणि येऊरमधील 'सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड' कंपनीकडून सुरू असलेल्या 'वादग्रस्त बांधकामा'च्या विरोधात येऊरमधील आदिवासींनी शुक्रवारी पाटोणपाडा ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य मोर्चा काढला. येऊर एन्व्हायर्नमेंटल सोसायटीशी संलग्न नऊ सामाजिक संघटना आणि आदिवासींनी प्रचंड संख्येत मोर्चात सहभागी होऊन प्रचंड शक्तीप्रदर्शन करत निवासी जिल्हाधिकाऱ्यांकडे त्यांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

येऊरचे जंगल शहराचे फुफ्फुस असून मागील चार महिन्यात सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लि.कडून बेकायदा बांधकाम होत असल्याचा आरोप आदिवासींनी निवेदनात केला आहे. सुपरड्रीम्सने भिंत उभारून तब्बल ५० ते ६० वृक्ष तोडले असून जंगलात २०० डंपर, ट्रक माती टाकण्यात आल्याने पर्यावरणास धोका निर्माण झाला आहे, असा गौप्यस्फोट आदिवासींनी त्यांच्या निवेदनात केला आहे. दरम्यान गेट १४ आणि १७ येथील सुपरड्रीम्सच्या बांधकामाचा ताबडतोब सर्व्हे करावा, ५० वर्षांपासून राहणाऱ्या आदिवासींना भूमाफियांपासून संरक्षण द्यावे, पालिकेकडे कर भरणाऱ्या आदिवासींना पाणी, वीज, रस्ते, स्वच्छतागृह हा मुलभूत सोयीसुविधा पुरवाव्यात, आदी मागण्यांचे सविस्तर निवेदन आदिवासींनी तसेच स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले.




दरम्यान, काही दिवसांपूर्वी ठाण्याच्या जिल्हाधिकारी डॉ. अश्विनी जोशी यांनी सुपरड्रीम्सच्या बांधकामाला भेट देऊन कारवाईचे आदेश दिले होते. मात्र आजतागायत जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश पाळण्यात आला नसल्याची बाब आदिवासींनी निवेदनातून निदर्शनास आणून दिली आहे.

### रस्ता खुला करा!

१८ एकरांच्या जमिनीवर सुरू असलेल्या बांधकामाबाबत सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड कंपनीला ठाण्याचे उपविभागीय अधिकारी सुदाम परदेशी यांनी बाजू मांडण्यास सांगितले आहे. तसेच आदिवासींच्या मागणीप्रमाणे वहिवाटीचा मुद्दा लक्षात बांधकामातून असणारा रस्ता खुला करण्याचे आदेशही उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिल्याचे तहसीलदार विकास पाटील यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.

**बांधकाम अधिकृतच!**

सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड कंपनीने सदर जागा रीतसर सबलीजने घेतली असून त्याबाबत वेळोवेळी संबंधित खात्याकडे कागदपत्र सादर करण्यात आली आहेत. जागेवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी कंपनीकडून कंपाऊड वॉल उभारण्यात आली आहे.

- सुपरड्रीम्स रिअल इस्टेट लिमिटेड कंपनी